ePaper
माणसातील राक्षस...! महाराष्ट्राला हादरवणाऱ्या संतोष देशमुखांच्या क्रूर हत्येचे फोटो समोर

| वर्ष - 8 | अंक - 227 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™



**आतील पानांत**

- रहाणे कोलकाताचा नवा कर्णधार!
- भारतासाठी सर्व देशांचा दुबई प्रवास
- विनोद वेगळा आणि अश्लीलता वेगळी!
- मुलांना लवकर जन्माला घाला

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 4 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अबू आझमी यांच्याकडून पुन्हा जातीयवादी विषपेरणी

# जातीयवादी विळखा; औरंगजेबाचा पुळका!

## देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा : सर्वच पक्षांचे आमदार गरजले; कडक कारवाईची मागणी

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अबू आझमी यांनी क्रूरकर्मा औरंगजेबावर स्तुतीसुमने उधळल्यामुळे महाराष्ट्रातील राजकारण अचानक तापले. सर्व पक्षाच्या आमदारांनी त्यांचा तीव्र शब्दात निषेध केला आणि त्यांच्याविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी केली. प्रत्येक वेळी जातीयवादी विष पेरून हिंदू-मुस्लिम तणाव वाढवण्याचा अबू आझमी यांचा प्रयत्न असतो. पूर्वी 'वंदे मातरम' म्हणण्यास नकार देऊन त्यांनी असाच तणाव निर्माण केला होता.**



महाराष्ट्रामध्ये छत्रपती संभाजी महाराज अर्थात शंभुराजे यांच्या जीवनावर आधारित 'छावा' हा चित्रपट अतिशय लोकप्रिय झाला असून त्याचे रोज नवनवीन रेकॉर्ड होत आहेत. त्यामुळे, संभाजी महाराजांना छळणाऱ्या, त्यांचे एक एक अवयव तोडणाऱ्या क्रूरकर्मा औरंगजेबाबाबत सगळीकडे संतापाची लाट उसळली आहे.

**मुस्लिमांना खुश करण्यासाठी..**

अशातच आता अबू आझमी यांनी वादात उडी घेतली असून औरंगजेबाची स्तुती केली आहे आणि तो कधीच क्रूर नव्हता, त्याने जे केले ते योग्यच केले, असे म्हणून राजकारण पेटवले आहे.

सत्ताधारी आमदारांनी या विरोधात जोरदार आवाज उठवला आहे, त्याचप्रमाणे, विरोधी आमदारांमध्येही संतापाची लाट आहे. उबाठा गटाचे सुनील प्रभू, आदित्य ठाकरे, अंबादास दानवे यांनी देखील अबू आझमी यांचा तीव्र शब्दात निषेध केला आहे.

**म्हणे औरंगजेबाने मंदिरे बांधली..**

क्रूरकर्मा औरंगजेबाने म्हणे मंदिरे बांधली आणि तो खूप दयाळू होता, असे उद्गार अबू आझमी यांनी काढल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्यावर कडाडून टीका केली आणि जनतेची माफी मागण्याबाबत सुनावले.

अबू आझमी यांच्या या देशद्रोही उद्गारानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातील वातावरण चांगलेच तापले आहे. विधिमंडळाचा आज पहिलाच दिवस होता आणि या दरम्यान सभागृहाच्या बाहेर माध्यमांशी बोलताना अबू आझमी यांनी देशप्रेमाशी प्रतारणा करून औरंगजेबावर स्तुती सुमने उधळली.. एक प्रकारे देशद्रोहच केला !

**अबू आझमी नेमकं काय म्हणाले?**

" चुकीचा इतिहास दाखवला जात आहे. औरंगजेबाने अनेक मंदिरे बनवलेली आहेत, बांधलेली आहेत. मी औरंगजेबाला क्रूर प्रशासक मानत नाही. तसेच छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील जी लढाई होती, ती लढाई राज्य कारभाराची होती. ती लढाई कुठेही हिंदू आणि मुस्लिम अशी नव्हती. "

**आदित्य ठाकरे यांनी केली अटकेची मागणी**

अबू आझमी यांनी औरंगजेबाची स्तुती करून छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केल्याचे शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. आझमींचे हे वक्तव्य हिंदूंच्या भावना दुखावणारे आहे, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्यांना अटक झाली पाहिजे, असे ठाकरे म्हणाले.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कडाडले..

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अबू आझमी यांच्या या देशद्रोही वक्तव्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चांगलाच समाचार घेतला. त्यांचे वक्तव्य अत्यंत चुकीचे आणि निंदनीय असेच आहे. कुख्यात औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचा तब्बल ४० दिवस अनन्वित छळ केला. त्यांच्या शरीराचे अक्षरशः लचके तोडायला लावले. अशा क्रूरकर्मा औरंगजेबाची स्तुती करणाऱ्या अबू आझमी यांनी सर्वप्रथम माफी मागितली पाहिजे. त्यांच्यावर आता देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांना तुरुंगात डांबले पाहिजे. अबू आजमी यांनी म्हटले आहे की औरंगजेब हा क्रूर प्रशासन नव्हता आणि त्याने केलेले कृत्य चांगलेच होते.

### भाजपनेही अबू आझमीला घेरले

भाजप नेते राम कदम यांनी अबू आझमी यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला आहे. ते म्हणाले, आझमी ज्या औरंगजेबाचे कौतूक करत आहेत, त्या औरंगजेबाने हिंदूंवर अनेक अत्याचार केले. अबू आझमी यांनी इतिहास वाचावा. क्रूर औरंगजेबाने आमच्या छत्रपती संभाजी महाराजांना किती क्रूरपणे मारले हे पाहण्यासाठी थिएटरमध्ये त्यांनी छावा चित्रपटही पाहावा.



अबू आझमी यांनी यापूर्वी औरंगजेबचे समर्थन केले आहे. 2023 मध्ये त्यांनी औरंगजेबचे समर्थन करणारे वक्तव्य केले होते. त्यावेळी त्यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली होती. या प्रकरणी मुंबईतील कुलाबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### अबू आझमीने तोडले अकलेचे तारे...

मी औरंगजेबाला क्रूर शासक मानत नाही. औरंगजेबने त्याच्या कारकिर्दीत अनेक हिंदू मंदिरे बांधली. तो एक महान राजा होता. त्याच्या काळात भारत 'सोने की चिड़िया' होता. त्याची राजवट पाहूनच इंग्रज भारतात आले होते. समाजवादी पक्षाचे नेते व मुंबईतील मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा मतदार संघातून निवडून आलेले आमदार अबू आझमी यांनी आपल्या अकलेचे तारे तोडले आहे. अबू आझमी यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केले आहे. मुगल सम्राट औरंगजेब याचे त्यांनी कौतूक केले आहे. औरंगजेब क्रूर शासक नव्हता. त्याने अनेक मंदिरे बनवली, असा दावा अबू आझमी यांनी केला आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर अबू आझमी यांच्यावर चौफेर टीका सुरु झाली आहे.

# कोंडीमुक्तीच्या दिशेने पहिले पाऊल!

## कारवाईमध्ये महामार्गालगतची 201 अतिक्रमणे हटविली

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहर आणि परिसरालगतचे महामार्ग वाहतूक कोंडीमुक्त करण्याच्या दृष्टीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पहिले पाऊल टाकले आहे. पीएमआरडीएसह अन्य शासकीय यंत्रणांनी संयुक्त कारवाई करत तीन प्रमुख मार्गावरील २०१ अतिक्रमणे हटवित आहेत. त्यामुळे २० हजार चौरस फुटांपर्यंतचा रस्ता मोकळा झाला आहे. ही कारवाई महिनाभर सुरू ठेवण्यात येणार आहे.**




शहर आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पुढाकार घेतला असून तीस दिवसांत रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्धार केला आहे. राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य मार्गाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अनधिकृत आणि अतिक्रमण केलेली दुकाने, गाळे, बांधकामे तसेच अन्य काही तात्पुरत्या स्वरूपाच्या बांधकामांवर विविध विभागांकडून संयुक्त कारवाई सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार सोमवारपासून या संयुक्त कारवाईला प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी तीन प्रमुख मार्गावरील २० हजार चौरस फुटांपेक्षा जास्त भागातील अतिक्रमणे काढून टाकण्यात आली.

पीएमआरडीए, पुणे महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, स्थानिक पोलीस, एमएसआरडीसी, सार्वजनिक बांधकाम विभागासह अन्य विभागांनी संयुक्त कारवाईसाठी वेळापत्रक निश्चित केले आहे. त्यानुसार अतिक्रमण निष्कासन मोहिमेच्या पहिल्याच दिवशी सोमवारी संयुक्तपणे एकूण २०१ अतिक्रमणात २० हजार १०० चौरस फुटांपर्यंतचे अतिक्रमण काढण्यात आले. यात पुणे नाशिक रोडवरील इंद्रायणी नदी ते बर्गे वस्ती भागात ७८, पुणे सोलापूर रस्त्यावर ७० तर चांदणी चौक पौड रस्त्याच्या दोन्ही बाजूचे एकूण ५३ अतिक्रमणे काढण्यात आल्याची माहिती पीएमआरडीए प्रशासनाकडून देण्यात आली. पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सह आयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी- पाटील, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम,पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कार्यकारी अभियंता शैलेजा पाटील, पुणे महापालिकेचे कार्यकारी अभियंता सदानंद लिटके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी कारवाई केली.

पुणे सोलापूर रस्त्यावरील हडपसर ते यवत आणि उरुळीकांचन ते शिंदवणे, नाशिक रस्त्यावरील राजगुरूनगर परिसर, चांदणी चौक ते पौड येथील अतिक्रमणांवर ३ मार्च ते १० मार्च या दरम्यान कारवाई होणार आहे. पुणे सातारा रस्त्यावरील नवले पूल ते सारोळे, सूस रस्ता, हडपसर (शेवाळेवाडी) ते दिवेघाट, नवलाख उंब्रे ते चाकण, हिंजवडी परिसर ते माण, तळेगाव-चाकण-शिक्रापूर येथील अतिक्रमणांवर १० मार्च ते २० मार्च या कालावधीत कारवाई करण्यात येणार आहे.

### अतिक्रमणे स्वत:हून हटविण्याचे आवाहन

राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या हद्दीतील पुणे-सातारा रस्त्यावरील सारोळा ते देहूरस्ता या दरम्यानच्या दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्यांवर अनेक ठिकाणी अतिक्रममे झाली आहेत. तसेच पुणे-सोलापूर आणि पुणे-नाशिक रस्त्यावरही अतिक्रमणे आहेत. त्यामुळे ही अतिक्रमणे संबंधितांनी स्वत:हून काढून टाकावीत, असे आवाहन राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरणाने केल आहे. अतिक्रमे हटविताना काही असुविधा निर्माण झाल्यास प्राधिकरण त्याला जबाबदार राहणार नसून कारवाईचा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येणार असल्याचेही प्राधिकरणाकडून सांगण्यात आले आहे.

# स्वारगेट प्रकरण चुकीच्या पद्धतीने हाताळलं

## राज्यात गुन्हेगारी घटना वाढल्या आहेत : खासदार सुप्रिया सुळे

। पुणे।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज (३ मार्च) स्वारगेट बस आगाराला भेट दिली. तसेच, जिथे बलात्काराची घटना घडली त्या परिसराची पाहणी केली आणि त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्या म्हणाल्या, “सरकारची आकडेवारी सांगतेय की गेल्या काही महिन्यांमध्ये राज्यातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे.**




प्रामुख्याने महिलांवरील अत्याचाराचं प्रमाणही वाढलं आहे. आज सकाळी चाकणमध्ये घडलेली घटना देखील धक्कादायक होती. गणवेशात असलेल्या एका पोलिसावर कोयता गँगने हल्ला केला. दोन दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीबरोबर गैरवर्तन झाल्याचा प्रकार समोर आला होता. तिच्याबरोबर सुरक्षेसाठी गणवेशातील पोलीस कर्मचारी होता. तरीदेखील टवाळखोरांच्या टोळीने अशी हिंमत केली. हे अतिशय धक्कादायक, दुर्दैवी व वाईट आहे. मी या घटनांचा निषेध करते”. स्वारगेटला घडलेली घटना पोलीस प्रशासनाने ज्या पद्धतीने हाताळली ते देखील अतिशय असंवेदनशीलपणाचं लक्षण आहे. मला या सरकारकडून खूप जास्त अपेक्षा होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या मंत्र्यांना सल्ले दिले आहेत की त्यांच्या मंत्र्यांनी थोडं संवेदनशील वागावं. कारण प्रत्येकाच्या घरात लेकी, सुना आणि मुली आहेत. अशा प्रकारची गलिच्छ घटना घडल्यानंतर कुठल्याही जबाबदार व्यक्तीने संवेदनशीलपणेच बोललं पाहिजे. असाच सूचना फडणवीसांनी प्रशासनालाही द्यायला हव्यात”.सुप्रिया सुळे म्हणाल्या, “स्वारगेटची घटना ज्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला गेला ते खूप दुर्दैवी आहे. जिथे ही घटना घडली तिथून मुख्य रस्ता अवघ्या २५ पावलांवर आहे. पोलीस ठाणे देखील जवळच आहे. ही घटना अंधारात किंवा कुठल्यातरी कोपऱ्यात घडली नव्हती. त्या बिचाऱ्या मुलीला प्रचंड भीती दाखवली गेली. समाज म्हणून अशा अत्याचाराच्या घटनेचा आपण निषेध केला पाहिजे. मी अनेकदा सत्ताधाऱ्यांना सांगितलं आहे. बदलापूरमध्ये चिमुरड्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आल्यानंतर मी सरकारला व तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली होती की अशा घटनांच्या कारवाईमध्ये आपल्या महाराष्ट्र राज्याने देशासमोर एक उदाहरण घालून द्यावं. या घटना फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून या प्रकरणांमधील गुन्हेगारांना भर चौकात फाशी द्यावी.

### चाकणमध्ये घडलेली घटना धक्कादायक

आज सकाळी चाकणमध्ये घडलेली घटना देखील धक्कादायक होती. गणवेशात असलेल्या एका पोलिसावर कोयता गँगने हल्ला केला. दोन दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीबरोबर गैरवर्तन झाल्याचा प्रकार समोर आला होता. तिच्याबरोबर सुरक्षेसाठी गणवेशातील पोलीस कर्मचारी होता. तरीदेखील टवाळखोरांच्या टोळीने अशी हिंमत केली. हे अतिशय धक्कादायक, दुर्दैवी व वाईट आहे.

## पोलीस उपायुक्तांसह सहायक निरीक्षकावर कोयत्याने हल्ला

# केंदूरघाटात पोलीस-दरोडेखोरामध्ये थरार!

### पोलिस उपायुक्तांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात दरोडेखोर जखमी; दोन दरोडेखोर गजाआड

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे, पिंपरी - चिंचवडमध्ये वाहनांचीतोडफोड, जीवघेणा हल्ला या माध्यमातून आधीच कोयता गँगने धुमाकूळ घातला आहे. त्यातच पिंपरी - चिंचवडमध्ये दरोडेखोरांना पकडण्यासाठी गेलेल्या पोलिस उपायुक्त व सहायक निरीक्षकावर दरोडेखोराने थेट कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची थरारक घटना चाकण पोलिस ठाण्याच्या हद्दीत २ मार्च रोजी मध्यरात्री घडली. मात्र, जखमी अवस्थेतही प्रसंगावधान राखत स्वसंरक्षणार्थ आणि सहकाऱ्यांच्या बचावा दाखल पोलिस उपायुक्तांनी आपल्या सर्व्हीस रिव्हॉल्वरमधून दरोडेखोरावर दोन गोळ्या झाडल्या. यातील एक गोळी लागून दरोडेखोर जायबंदी झाला. पोलीसांनी त्वरीत त्याला जेरबंद केले. तर, घटनेदरम्यान जंगलात पळून गेलेल्या दुसऱ्या अल्पवयीन दरोडेखोराला पोलिसांनी शिताफीने पकडले.**







सचिन चंदर भोसले असे अटक केलेल्या दरोडखोराचे नाव आहे. तर, अल्पवयीन आरोपीला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिस उपायुक्त शिवाजी पवार आणि सहायक पोलिस निरिक्षक प्रसन्न जऱ्हाड हे या हल्ल्यात जखमी झाले आहेत. पोलिस उपायुक्त शिवाजी पवार यांच्या छातीला पाच टाके पडले असून सहायक निरिक्षक प्रसन्न जऱ्हाड यांच्या दंडालाही मोठी जखमी झाली आहे. दोघेही रुग्णालयात उपचार घेऊन पुन्हा कर्तव्यावर हजर झाले आहेत. तर, दरोडेखोर सचिन याच्या उजव्या पायाला गोळी घासून गेल्याने तो जखमी झाला आहे. पोलिसांनी त्याला सुरुवातीला चाकण येथील एका रुग्णालयात नेले. तेथे प्राथमिक उपचारानंतर पिंपरी - चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथून त्याला ससून रूग्णालयात हलविण्यात आले. खेड तालुक्यातील बहुळ येथे २३ फेब्रुवारी रोजी वृद्ध दाम्पत्याच्या घरात घुसून सहा दरोडेखोरांनी चाकू आणि सुरीचा धाक दाखवत लूटमार केली होती. वृद्धाच्या मुलगा आणि सुनेवर चाकूने जीवघेणा हल्ला करून दरोडेखोरांनी घरातील सोन्याचे दागिने आणि रोकड लुटून पोबारा केला होता. या घटनेमुळे परिसरात दहशत निर्माण झाली होती. या प्रकरणाचा तपास पोलिस करत होते. पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, बहुल येथील घटनेतील दरोडेखोर चिंचोशी गावात आणखी एक दरोडा टाकण्याच्या तयारीत आहेत. त्यानुसार, पोलिस उपायुक्त शिवाजी पवार यांच्या र्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचला. पोलिस उपायुक्त शिवाजी पवार सुट्टीवर असतानाही त्यांनी दरोडेखोरांना पकडण्यासाठी पुढाकार घेतला. पोलिस उपायुक्त, एक सहायक पोलिस निरिक्षक आणि नऊ कर्मचाऱ्यांचे पथक घेऊन ते चिंचोशी गावातील केंदूरघाट येथे पोहोचले. केंदूरघाटातील मंदीरात दरोडेखोर दबा धरून बसल्याचे दिसून आले. पोलिसांनी दरोडेखोरांना शरण येण्याचे आवाहन केले. मात्र, दरोडेखोरांनी शरण न येता पोलिसांवर थेट हल्ला चढवला. सचिन याने पोलीस उपायुक्त पवार यांच्यावर कोयत्याने वार केला. मात्र, प्रसंगावधान राखत पवार यांनी वार चुकवला. मात्र, हा वार त्यांच्या छातीवर बसला. सहायक निरीक्षक जऱ्हाड यांनी सचिन याला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्यावरही सचिनने वार केला. हा वार जऱ्हाड यांच्या डाव्या दंडावर बसला. या हल्ल्यात पोलिस उपायुक्त आणि सहायक पोलिस निरिक्षक दोघेही जखमी झाले. हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी पोलिस उपायुक्तांनी दरोडेखोर सचिनवर दोन गोळ्या झाडल्या. एक गोळी सचिनच्या उजव्या पायाला घासून गेल्याने तो जखमी झाला. पोलीसांनी त्वरीत त्याला जेरबंद केले. तर, घटनेदरम्यान जंगलात पळून गेलेल्या दुसऱ्या अल्पवयीन दरोडेखोराला पोलिसांनी पाठलाग करून शिताफीने पकडले.

#### उपचारानंतर पुन्हा कर्तव्यावर

पोलिस उपायुक्त शिवाजी पवार यांना छातीला पाच टाके पडले. तसेच, सहायक पोलिस निरिक्षक प्रसन्न जऱ्हाड यांच्या दंडाला तीन टाके पडले आहेत. पोलिस उपायुक्त पवार हे शांत आणि संयमी स्वभावाचे अधिकारी आहेत. आपल्या हद्दीतील कायदा सुव्यवस्था चांगली रहावी, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशिल राहतात. गुन्हेगारी वाटेवर जाणाऱ्या अनेक तरुणांचे त्यांनी समुपदेशन केले आहे. दोघेही रुग्णालयात उपचार घेऊन कर्तव्यावर हजर झाले आहेत.

#### दरोडखोरावर नऊ गुन्हे दाखल

बहुळ येथील दरोडा प्रकरणातील मुख्य आरोपी सचिन चंदर भोसले आणि अल्पवयीन आरोपी हे पोलिसांच्या रडारवर होते. ते पुन्हा दरोड्याच्या तयारीत असल्याची माहिती चाकण पोलिसांना मिळाली होती. सचिन भोसले हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी नऊ गंभीर गुन्हे दाखल आहेत. गंभीर दुखापत, घरफोडी, चोरी, दरोडा, दरोड्याची तयारी असे गुन्हे भोसले यांच्यावर दाखल आहेत.न

## पिंपरी-चिंचवडसाठी मुळशीतील पाणी आरक्षणाची मागणी!

### अर्थसंकल्पीय अधिवेशन: जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवड : वाढती लोकसंख्या आणि भविष्यकाळात पाण्याची मागणी लक्षात घेता पिंपरी-चिंचवड शहरासाठी मुळशी धरणातून पाणी आरक्षणाला मंजुरी देण्याबाबत महायुती सरकारने सकारात्मक विचार करावा, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

#### भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार



महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची आमदार लांडगे यांनी मुंबईत भेट घेतली. यावेळी पिंपरी-चिंचवडचा पाणी पुरवठा आणि नवीन जलस्त्रोत निर्मिती याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.


याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे 30 लाखांच्या घरात आहे. शहरातील वाढते नागरीकरण आणि पाण्याची मागणी याचा विचार करता भविष्यात पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर होणार आहे. त्यामुळे अतिरिक्त जलस्त्रोत निर्माण करण्याची नितांत आवश्यकता असून, मुळशी धरणातून पिंपरी-चिंचवडसाठी पाणी आरक्षीत करावे, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने राज्य शासनाला पाठवला आहे.

दरम्यान, पुण्यात कालवा समितीची बैठक झाली. या बैठकीमध्ये उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांच्याकडे स्थानिक आमदारांनी पुण्यासाठी मुळशी धरणातून पाणी आरक्षणाबाबत मागणी केली आहे. त्यासंदर्भात कालवा समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. त्याला अनुसरून, पिंपरी-चिंचवडसाठीसुद्धा मुळशी धरणातून पाणी आरक्षीत व्हावे, याबाबत सकारात्मक विचार करावा, अशी विनंती आमदार लांडगे यांनी केली आहे.

> पिंपरी-चिंचवडकरीता मुळशी धरणातून पाणी आरक्षण मिळावे. यासाठी महापालिका प्रशासनाने राज्य सरकारकडे पाठपुरावा केला आहे. त्यासाठी पाणी पुन:स्थापना खर्च भरण्याचीही तयारी आहे. त्यामुळे मुळशी धरणातून पाणी आरक्षणाबाबत बैठकीत पिंपरी-चिंचवड शहराचाही सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी आग्रही मागणी आम्ही मंत्री महोदय यांच्याकडे केली असून, त्यावर सकारात्मक निर्णय होईल. ज्या महायुती सरकारने आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पातून पिंपरी-चिंचवडकरांना पाणी दिले, तसेच महायुती सरकार आता मुळशी धरणातूनही आम्हाला पाणी देईल, असा विश्वास आहे.
>
> **–महेश लांडगे,**
>
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

पाणी मागणी व पुरवठा प्रमाण व्यस्त... पिंपरी-चिंचवड शहराला सध्या पवना धरण आणि आंद्रा, भामा- आसखेड धरणातून पाणी पुरवठा सुरू आहे. मात्र, पवना बंद जलवाहिनी प्रकल्प अद्याप सुरू नाही. तसेच, आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाचा दुसरा टप्पा अद्याप कार्यान्वयीत झालेला नाही. सबब, शहरातील पाण्याची मागणी आणि पुरवठा याचे प्रमाण व्यस्त असून, सोसायटीधारकांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. परिणामी, पाणी पुरवठा आणि टंचाई ही समस्या संवेदनशील बनली आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंच जरूरीपुरताच करावा

पुष्कळ लोक जोडधंदा करतात; म्हणजे, त्यांचा एक मुख्य धंदा असतो, आणि त्याला मदत म्हणून दुसरा धंदा करतात. त्यांचे सर्व लक्ष मुख्य धंद्याकडे केंद्रित झालेले असते. म्हणजे, जोडधंद्यामुळे जर मुख्य धंद्यात व्यत्यय येऊ लागला तर तो जोडधंदा जरुरीप्रमाणे बंदही करतात किंवा नफा-नुकसानीचा प्रसंग आला तर जोडधंद्यातल्या नफा-नुकसानीकडे विशेष आस्थेने पाहात नाहीत. प्रत्येक माणसाने परमार्थ हा मुख्य धंदा ठेवून, प्रपंच हा जोडधंदा म्हणून करावा; म्हणजेच प्रपंचात होणाऱ्या लाभहानीचा परिणाम भगवंताच्या अनुसंधानावर होऊ देऊ नये. परमार्थाच्या आड प्रपंच न येईल अशा युक्तीने वागावे. भाजीला जसे मीठ लागते तसा परमार्थाला प्रपंच लागतो. मीठ नसेल तर भाजी आळणी लागते, पण मीठ जास्त झाले तर भाजी खाववत नाही. त्याचप्रमाणे प्रपंच आणि परमार्थ यांचा संबंध आहे. काही लोकांना सवयीने मीठ जास्त लागते, तसे ज्यांना प्रपंचाची सवय झाली आहे, त्यांना तो जास्त लागतो. त्यांची गोष्ट निराळी, पण ज्यांना प्रपंच नवीन सुरू करायचा आहे, त्यांनी तरी तो बेतानेच करावा. भगवंत डोळ्यांपुढे ठेवून वागावे. प्रपंचात व्यवहार जतन करावा खरा, पण प्रपंच हाच काही सर्वस्व नव्हे. भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी तो बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्यामुळे तो होवो किंवा प्रपंचात दु:ख झाल्यामुळे होवो. प्रत्येकाला प्रपंचाची अत्यंत जरुरी आहे; पण आपण त्याला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देतो, आणि त्यामुळे सर्व बिघडते. प्रपंच पाहिजे आणि दु:ख नको असे म्हणणे वेडेपणाचे आहे. मूल असेल तर ते कधी तरी आजारी पडायचेच. प्रपंच हा कुणाला सुटला आहे ? हा प्रपंच, हा संसार भगवंतानेच उत्पन्न केला आहे तर तो कुणाला तरी सुटेल का ? तसा नुसता प्रपंच तापदायक नाही, तर आकुंचित प्रपंच हा तापदायक आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या या खिशातले पैसे त्या खिशामध्ये ठेवतो, त्याचप्रमाणे प्रपंचातले आपले मन काढून भगवंताकडे लावावे; तसे करण्यात समाधान आहे. नवरा-बायकोचे ध्येय एकच असेल तर त्यांचा प्रपंच सुखाचा होतो. जो मनुष्य हौसेने प्रपंच करील, त्याला तो करायला चोवीस तासही पुरणार नाहीत; पण जो जरुरीपुरता प्रपंच करील, त्याला तीन-चार तास पुरतील. प्रपंचामध्ये कर्तव्याला चुकू नये, पण त्यामध्ये आसक्तीने गुंतून राहू नये. आपले व्यवहाराचे कर्तव्य मनापासून केल्यानंतर त्याचे फळ रामाकडे सोपवावे. रामाचे नाव शक्य तितके घेऊन, आपले मन त्याच्या ठिकाणी चिकटावे यासाठी त्याची मनापासून प्रार्थना करावी.

बोधवचन:- प्रपंच हा मोडक्या वस्तू नीट करण्याचा कारखाना आहे. तिथे मोडक्या वस्तू जितक्या जास्त असतील तितकी शिकणाऱ्याला संधी जास्त असते.

# पालकमंत्रीपदांचे घोंगडे अजूनही भिजतच!



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

**संस्थापक, संपादक**

**देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर घोंड आडलं ते पालक मंत्रीपदावर ! रायगडचं पालकमंत्रीपद शिवसेनेला पाहिजे होतं, तर नाशिकवर भारतीय जनता पक्षानं दावा सांगितला होता. इतके दिवस झाले तरी पालकमंत्रीपदाचं घोंगडं अजूनही भिजतच पडलं आहे..!**



### बंडखोरांच्या तलवारी म्यान !

नाशिकसह आता रायगडमधील बंडखोरांच्या तलवारी म्यान झाल्या की काय अशी परिस्थिती आहे. मुख्यमंत्र्यांची शिष्टाई कामी आली असावी. पालकमंत्रीपदाचा तिढा लवकरच सुटण्याची चिन्हं दिसत आहेत, याची कारणं लक्षात घेऊन या. नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा असल्याने नाशिकचे पालकमंत्रीपद भाजपा सहज सोडेल असे वाटत नाही. तर दुसरीकडे रायगड पालकमंत्री पदाबाबततोडगा निघण्याची शक्यता आहे. नाशिकमध्ये दादा भुसे आशावादी आहेत, तर दुसरीकडे आदिती तटकरे यांच्या जागेवर ऐवजी भरतशेठ गोगावले यांचा दावा कायम आहे.

### कुंभमेळ्यासाठी मोठी संधी

नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा असल्याने भाजपासाठी ही मोठी संधी आहे. त्यासाठीचे मोठे नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे भाजप नाशिकचे पालकमंत्रीपद सहजासहजी सोडेल असे वाटत नाही. सध्या गिरीश महाजन हे नाशिकचे पालकमंत्री असल्याचे संकेत भाजपाच्या गोटातून देण्यात येत आहेत. सध्या तशी बॅनरबाजी पण करण्यात येत आहे. रायगड बाबतचा निर्णय अजितदादा पवार आणि एकनाथ शिंदे यांनी सामंजस्याने सोडवावा, असे भाजपच्या नेत्यांनी सांगितल्याचे समजते.

### फडणवीस,शिंदे एकाच वाहनात

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे रायगड दौऱ्यावर असताना गेल्या आठवड्यात एकाच वाहनातून प्रवास करत गेले. त्यावेळी काहीतरी तोडगा निघाला असणार! दोघांनी महाड येथील चवदार तळ्याला भेट दिली. त्यानंतर पुढील कार्यक्रमाला जात असताना फडणवीस यांनी त्यांच्या वाहनात एकनाथ शिंदे, भरत गोगावले आणि मंत्री आदिती तटकरे यांना सोबत घेतले. चार जणांनी एकाच वाहनातून प्रवास केल्याने पालकमंत्रीपदावर तोडगा निघण्याची शक्यता वाढल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. पण, अजून निर्णय जाहीर झालेला नाही. आता एकनाथ शिंदे अथवा अजितदादा यापैकी कोण तोडग्यावर राजी होते आणि एक पाऊल मागे घेते हे लवकरच समोर येईल.

### गिरीश महाजन यांचे बॅनर चर्चेत

भाजप नेते गिरीश महाजन हेच नाशिकचे पालकमंत्री असल्याचे संकेत भाजपाच्या गोटातून समोर येत आहेत. तर आज मंत्री गिरीश महाजन यांचे नाशिकमध्ये लागलेले बॅनर चर्चेत आले आहेत. हिंदू जनसेवक गिरीश भाऊ नाशिकचे पालकमंत्री.. आशयाचे बॅनर शहरात लागले आहेत. पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नसतानाही समर्थकांकडून बॅनरबाजी सुरू आहे, यामधील पडद्यामागचे राजकारण पाहायला हवे !

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गिरीश महाजन नाशिकचे पालकमंत्री होणार अशी चर्चा असतानाच ही बॅनरबाजी होत आहे. त्यामुळे या दोन जिल्ह्यांसह इतर ठिकाणच्या पालकमंत्रीपदाचा तिढा सुटण्याची शक्यता आहे.

### प्रचंड बहुमत मिळून देखील!

महाराष्ट्रात महायुतीला दृष्ट लागेल असे बहुमत मिळाले आहे. पण, म्हणतात ना.. या मंडळींना सुखाने खाता येत नाही. विशेषतः रायगडचे पालकमंत्री पद पाहिजे म्हणून अडून बसलेल्या भरत गोगावले यांना कुणीतरी समजावून सांगण्याची गरज आहे. परंतु भर सभेत किंवा पत्रकारांसमोर आपला मुद्दा पटवून देण्याची त्यांची सवय त्यांच्याच पक्षाला अडचणीत आणणारी आहे. आधी, मला मंत्रीपद द्या, म्हणून ते गेली अडीच वर्षे रुसून बसले होते आणि आता मंत्रिपद मिळाले तर पालकमंत्रीपद द्या म्हणून देव देवतांना नवस करू लागले आहेत !

तिकडे नाशिकचे पालकमंत्रीपद मात्र भाजपाकडेच राहील असे संकेत मिळत आहेत. त्या ठिकाणी एकनाथ शिंदे यांचा गट एक पाऊल मागे घेईल आणि गिरीश महाजन हेच नाशिकचे पालकमंत्री होतील, असे 'सिग्नल' देण्यात आले आहेत, हे आता महत्त्वाचे ठरणार आहे. दोन्ही जिल्ह्यांचा पालकमंत्रीपदाचा वाद लवकरात लवकर मिटावा, यासाठी महायुतीमध्ये ही चर्चा सुरू झाली असून तडजोड आणि सर्वमान्य तोडगा निघेल, याचीच शक्यता आहे!

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# औरंगजेबाने कोणती मंदिरे बांधली?

## अबू आझमींच्या विधानावर अंबादास दानवे संतापले

।मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी आज माध्यमांशी बोलताना औरंगजेबाबाबत एक विधान केलं. त्यांच्या विधानामुळे आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. 'औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता', असं वक्तव्य अबू आझमी यांनी केलं. एवढंच नाही तर औरंगजेबाने मंदिरे बांधल्याचं अबू आझमी यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया येत आहेत. आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी आमदार अबू आझमी यांच्या विधानावर बोलताना संताप व्यक्त केला आहे. तसेच 'औरंगजेबाने कोणती मंदिरे बांधली? याची यादी द्या', असं आव्हान अंबादास दानवे यांनी अबू आझमी यांना दिलं आहे.**



समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाबाबत एक विधान केलं आहे. त्यामुळे नवा वाद रंगण्याची शक्यता आहे. आज विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला दिवस होता. या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दरम्यान विधिमंडळाच्या बाहेर माध्यमांशी बोलताना आमदार अबू आझमी यांनी औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता असं विधान केलं आहे. त्यांच्या या विधानानंतर अनेकांनी टीकेची झोड उठवली आहे. "चुकीचा इतिहास दाखवला जात आहे. औरंगजेबाने अनेक मंदिर बनवलेली आहेत. मी औरंगजेबाला क्रूर प्रशासक मानत नाही. तसेच छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील जी लढाई होती, ती लढाई राज्य कारभाराची होती. ती लढाई कुठेही हिंदू आणि मुस्लिम अशी नव्हती", असं अबू आझमी यांनी म्हटलं आहे.मी असं मानतो की औरंगजेबाच्या काळात भारताची सीमा अफगाणिस्तानपर्यंत होती. त्या काळात आपला जीडीपी २४ टक्के एवढा होता.

तेव्हा भारताला सोने की चिड़िया म्हटलं जायचं. मग मी याला चुकीचं म्हणू का? तसेच छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेबाची लढाई ही धर्माची होती असं मी मानत नाही", असं अबू आझमी यांनी म्हटलं. ते एबीपी माझा या वृत्तवाहीनीशी बोलत होते. आमदार अबू आझमी यांच्या विधानावर बोलताना अंबादास दानवे यांनी म्हटलं की, "औरंगजेबाने किती मंदिरं बांधली? याची यादी अबू आझमी यांनी द्यावी, तसेच औरंगजेबाने किती मंदिरं तोडली याची यादी आम्ही तुम्हाला देतो", असं अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे.चुकीचा इतिहास दाखवला जात आहे. औरंगजेबाने अनेक मंदिर बनवलेली आहेत. मी औरंगजेबाला क्रूर प्रशासक मानत नाही. तसेच छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील जी लढाई होती, ती लढाई राज्य कारभाराची होती. ती लढाई कुठेही हिंदू आणि मुस्लिम अशी नव्हती. मी असं मानतो की औरंगजेबाच्या काळात भारताची सीमा अफगाणिस्तानपर्यंत होती. त्या काळात आपला जीडीपी २४ टक्के एवढा होता. तेव्हा भारताला सोने की चिड़िया म्हटलं जायचं. मग मी याला चुकीचं म्हणू का? तसेच छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेबाची लढाई ही धर्माची होती असं मी मानत नाही", असं विधान अबू आझमी यांनी केलं.औरंगजेबाचं उदात्तीकरण करणं हे अतिशय दुर्दैवी आहे. अबू आझमी यांच्या विधानाचा निषेध करावा तेवढा कमी आहे. अबू आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला पाहिजे. औरंगजेबाचं कौतुक करणं हे महापाप आहे", असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.अबू आझमी अशा प्रकारे जे विधान करत आहेत ते कोणाची सुपारी घेऊन करत आहेत? कोणते वाद निर्माण करण्याचा ते प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्रात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, हे मी याआधीही सांगितलं होतं. कोणाचा इशारा आणि कोण बोलायला लागतं हे मी आधीही सांगितलं होतं. महाराष्ट्रात असं विधान कोणी करत असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

### राम कदम काय म्हणाले?

महाराष्ट्रात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, हे मी याआधीही सांगितलं होतं. कोणाचा इशारा आणि कोण बोलायला लागतं हे मी आधीही सांगितलं होतं. महाराष्ट्रात असं विधान कोणी करत असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे", अशी प्रतिक्रिया आदित्य ठाकरेंनी दिली."खरं तर अबू आझमी यांना इतिहासाचं पुस्तक देण्याची गरज आहे. ते जेव्हा सभागृहात येतील तेव्हा मी त्यांना इतिहासाचं पुस्तक भेट देणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने कशा पद्धतीने कैदेत ठेवलं होतं, कसा छळ केला हे अबू आझमी यांना माहित नाही का?

---

# आम्हाला यातला एकही रुपया नको!

## दत्ता गाडेला पकडून देऊनही सरपंचांनी नाकारलं लाखाचं बक्षिस

।पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पुणे शहरातील स्वारगेट आगारात एका महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप असलेल्या दत्तात्रय रामदास गाडे याला त्याच्या मूळ गावी गुणाट येथून अटक केल्यानंतर दोन दिवसांनी गावात वेगळाच वाद सुरू झाला आहे. पोलिसांनी जाहीर केलेली एक लाख रुपयांची बक्षीसाची रक्कम आता गावकऱ्यांमध्ये वादाचं कारण ठरत असल्याने सरपंचांनी एक मोठा निर्णय जाहीर केलाय.**




पुणे शहरापासून सुमारे ७५ किमी अंतरावर आणि शिरूरपासून २० किमी अंतरावर सुमारे साडेतीन हजार लोकसंख्या असलेलं गुणाट हे गाव आहे. पुण्यातील स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे हा याच गावचा आहे. खरंतर हा सगळं प्रकार जेव्हा उघडकीस आला तेव्हा गाडे हा पोलिसांपासून लपण्यासाठी आपल्या गावीच गेला होता. उसाच्या शेतातील एका खड्ड्यात गाडे लपून बसला होता आणि इथूनच त्याला अटक करण्यात आली. हा गुन्हा घडल्यानंतर जवळपास ७० तास गाडे फरार होता. लवकरात लवकर त्याचा पत्ता लागावा यासाठी पोलिसांनी टीप देणाऱ्याला १ लाखाचं बक्षीस जाहीर केलं होतं आणि आता गाडेला अटक केल्यानंतर याच १ लाखांवरुन गावात गोंधळ सुरू आहे.गुणाटचे सरपंच रामदास काकडे यांनी सांगितले की, अनेक ग्रामस्थ गाडेला आम्ही पकडून दिलं, त्याच्यासंबंधीची माहिती आम्ही दिली असा दावा करत असल्याने ही बक्षिसाची रक्कम नक्की द्यायची कुणाला याचा गोंधळ सुरू झाला. हे टाळण्यासाठी आम्ही ग्रामपंचायतीची एक सभा घेणार आहोत, जिथे आम्ही हे जाहीर करणार आहोत की या बक्षिसाच्या रकमेचा एकही रुपया आम्हाला नकोय. ज्या ज्या लोकांनी पोलिसांना आरोपी पकडण्यात मदत केली त्यांच्याशी आम्ही बोललो असून त्यांनीही होकार दिला आहे. या घटनेमुळे गावाची बदनामी झाली आहे. ही अभिमानाची गोष्ट नाही असंही काकडे यांनी सांगितलं आहे.आरोपीला पकडण्यासाठी गावकऱ्यांनी पोलिसांना कशी मदत केली हे सांगताना काकडे म्हणाले, "पोलिस शिक्रापूर आणि शिरूरमध्ये आरोपींचा शोध घेत असल्याचे आम्ही ऐकले. मात्र नंतर गुणाटचे नाव सर्वत्र आल्याने गावकरी चिंतेत पडले. त्यानंतर आम्ही पोलिसांना त्याच्या शोध मोहिमेत मदत करण्याचे ठरवले. आरोपी दोन घरांमध्ये पाणी प्यायला गेला असल्याची माहिती दोन गावकऱ्यांनी पोलिसांना दिली.

### गाडेमुळे कुटुंबीयांना त्रास

दरम्यान हे सगळं घडत असताना आणखी एका गावकऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर गावातील आरोपीच्या नातेवाईकांना होणाऱ्या त्रासाबाबतही खेद व्यक्त केलाय.मला त्याच्याबद्दल सहानुभूती नाही. मात्र गेल्या तीन दिवसांपासून मीडिया त्याच्या घराचे फोटो क्लिक करत इथे येत आहे. घर दाखवून काय फायदा?

# विनोद वेगळा आणि अश्लीलता वेगळी!

## रणवीर अलाहाबादियाला सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**द इंडियाज गॉट लेटेंट या शोमध्ये रणवीर अलाहाबादियाने वादग्रस्त विधान केल्यानंतर तो अडचणीत आला होता. त्याच्यावर मुंबई आणि आसाम राज्यात गुन्हा दाखल झाला होता. पुढील आदेश येईपर्यंत त्याच्या सर्व शोचे प्रदर्शन रोखण्यात आले होते. आज सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत रणवीर अलाहाबादियाच्या वतीने त्याचा पॉडकास्ट कार्यक्रम पुन्हा सुरू करू द्यावा, अशी मागणी केली होती. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने रणवीरला दिलासा दिला असून त्याचा पॉडकास्ट शो पुन्हा सुरू करण्याची परवानगी दिली आहे. तसेच पुढील आदेश येईपर्यंत त्याच्या अटकेलाही स्थगिती मिळाली आहे.**



रणवीर अलाहाबादियाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत त्याच्या 'शो'च्या प्रदर्शनावर घातलेली बंदी मागे घेण्याची मागणी केली. अलाहाबादियाने म्हटले की, त्याच्या 'शो'साठी २८० कर्मचारी काम करतात. शो बंद झाल्यास त्यांच्या चरितार्थाचा प्रश्न निर्माण होईल, असे याचिकेतून सांगितले गेले.सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, मूलभूत अधिकार हे अनिर्बंध नाहीत, त्यावर काही मर्यादा आहेत. सध्या याचिकाकर्त्याच्या 'शो'वर बंदी घातलेली आहे. पॉडकास्ट सादर करताना नैतिकता, सभ्यता आणि शालीनतेचे पालन केले, जेणेकरून कोणत्याही वयोगटातील प्रेक्षक हा 'शो' पाहू शकतील, असे हमीपत्र याचिकाकर्ता देत असेल तर त्यांना शो पुन्हा सुरू करण्यासाठी परवानगी देता येईल.रणवीर अलाहाबादियाच्या याचिकेविरोधात केंद्र सरकारकडून महाधिवक्ता तुषार मेहता मांडत होते. ते म्हणाले की, कुतूहलापोटी मी रणवीर अलाहाबादिया जे बोलला तो व्हिडिओ पाहिला. मला वाटते, त्याचे बोलणे अश्लीलच नाही तर विकृत होते. विनोद वेगळा आणि अश्लीलता वेगळी. तर विकृती त्यापुढची पातळी आहे. त्यामुळे रणवीर अलाहाबादियाला काही काळ बोलू न देणे उत्तम राहिल. यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, शो प्रदर्शित करण्यासाठी काही नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे. 'शो'मध्ये सभ्यतेचे नियम पाळले जावेत. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला याबाबत काही नियमावली तयार करण्याचे निर्देश दिले. जे संविधानाच्या कलम १९ (४) अन्वये देण्यात आलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराला बाधा आणणार नाहीत. केंद्र सरकारने असा काही मसुदा तयार केल्यास तो सार्वजनिक करावा, जेणेकरून या विषयाशी संबंधित लोक त्यावर सूचना आणि हरकती नोंदवू शकतील. त्यानंतर त्याच्यावर कायदा किंवा न्यायिक मोहोर उमटली जावी, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.युट्यूबर समय रैनाच्या द इंडियाज गॉट लेटेंट या कार्यक्रमात रणवीर अलाहाबादियाने केलेल्या आक्षेपार्ह विधानानंतर त्याचे तीव्र पडसाद उमटले होते. आसाम आणि मुंबईमध्ये रणवीर अलाहाबादिया, आयोजक आणि सहभागी परिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर रणवीर अलाहाबादियाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन अटकेपासून संरक्षण मिळविण्याची मागणी केली होती. आज पुन्हा एकदा रणवीर अलाहाबादियाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत त्याच्या 'द रणवीर शो' या पॉडकास्टला पुन्हा सुरू करण्याची मागणी केली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने ही परवानगी देत असताना समय रैनाने कॅनडामध्ये केलेल्या एका विधानावर नाराजी व्यक्त करत, ही मुले ओव्हारस्मार्ट आहेत, असे म्हटले. 'द इंडियाज गॉट लेटेंट'च्या त्या वादग्रस्त भागानंतर समय रैना कॅनडामध्ये शो साठी गेला होता. त्यानंतर भारतात गदारोळ सुरू झाला. या वादाबाबत समय रैनाने कॅनडात विनोद केला होता आणि कायदेशीर कारवाईवर भाष्य केले. आज झालेल्या सुनावणीदरम्यान समय रैनाचे नाव न घेता सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सुर्य कांत म्हणाले, "यांच्यापैकी (आरोपी) एकाने कॅनडामध्ये कायदेशीर प्रक्रियेबाबत भाष्य केले. या तरुणांना वाटते की, ते अतिहुशार (ओव्हारस्मार्ट) आहेत. त्यांना कदाचित आम्ही कालबाह्य झालेले वाटत असू. पण त्यांना या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र कदाचित माहीत नसावे. आम्ही जर ठरवले तर काय करू शकतो. पण आम्हाला हे करायचे नाही. कारण ही तरूण मुले आहेत, आम्ही समजू शकतो."

### तुम्ही इथे तिकीट काढून आलात

फेब्रुवारी महिन्यात कॉमेडियन समय रैनाने भारतातील वादाबाबत कॅनडात भाष्य केले. "तुम्ही इथे तिकीट काढून आलात, त्यामुळे मला आता भारतातला खटला लढविण्यासाठी काही पैसे मिळतील", असा विनोद समय रैनाने केला होता. समय रैनाच्या या विनोदाचा उल्लेख त्याचा चाहता असलेल्या शुभम दत्ता याने केला आहे.

# लवकरात लवकर मुलांना जन्माला घाला!

## तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिनचे दाम्पत्यांना आवाहन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सीमांकन आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणावरील वादादरम्यान तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के स्टॅलिन यांनी सोमवारी नागरिकांसाठी एक विचित्र आवाहन केलं आहे. त्यांनी राज्यातील नागरिकांना तत्काळ मुलं जन्माला घालण्याचं आवाहन केलंय. लोकसंख्या आधारित सीमांकनामुळे संसदेत तामिळनाडूचे सदस्य कमी होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.**



तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी नागाई जिल्ह्यातील सचिवाच्या लग्नसोहळ्यात हजेरी लावली होती. त्यावेळी ते म्हणाले, "पूर्वी आम्ही म्हणायचो की वेळ घ्या आणि मग मुलांना जन्माला घाला. पण आता परिस्थिती बदलली आहे. आता तत्काळ मुलांना जन्माला घाला असं म्हणावं लागेल.

आपण कुटुंब नियोजन योजन यशस्वीरित्या राज्यात राबवली. पण त्याचा परिणाम आता आपल्याला भोगावा लागतोय."सीमांकनाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी, स्टॅलिन यांनी ५ मार्च रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. मुख्यमंत्र्यांनी सर्वांनी एकत्र येऊन तामिळनाडूच्या भविष्याचा विचार करावा अशी इच्छा व्यक्त केली. विरोधी पक्षांना बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन करताना ते म्हणाले, "मी त्यांना बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन करतो.

कृपया अहंकार बाजूला ठेवा. तुम्ही माझे आवाहन का ऐकावे याचा विचार करू नका", असं स्टॅलिन म्हणाले. तामिळनाडूसाठी हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, यावरही त्यांनी भर दिला.

स्टॅलिन यांनी घोषणा केली होती की निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत ४० राजकीय पक्षांना मतदारसंघांच्या सीमांकनाच्या परिणामांवर चर्चा करण्यासाठी बैठकीला आमंत्रित करण्यात आले आहे. ज्याचे वर्णन त्यांनी "तामिळनाडूवर लटकणारी तलवार" असे केले होते.

### तामिळनाडूच्या भविष्याचा विचार करावा

२५ फेब्रुवारी रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर बोलताना स्टॅलिन यांनी अधोरेखित केले होते की तामिळनाडूने कुटुंब नियोजन धोरणांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे आता राज्याचे नुकसान झाले आहे. "जर लोकसंख्या जनगणनेच्या आधारे सीमांकन लागू केले गेले तर तामिळनाडूतून आठ खासदार कमी होतील.

# महिन्यातून किती गोड खाते वल्लरी ?



‘नवरी मिळे हिटलरला'या मालिकेतून अभिनेत्री वल्लरी विरा घराघरांत पोहोचली आहे. या मालिकेतून अभिनेत्रीला मोठी प्रसिद्धी मिळाली. झी मराठी वाहिनीवर प्रदर्शित होणारी ही मालिका मोठी लोकप्रिय ठरलेली दिसते. आता या मालिकेत वल्लरी विराजने लीला ही भूमिका साकारत सर्वांची मने जिंकली आहेत. अभिनयाबरोबरच सोशल मीडियावरील अभिनेत्रीच्या फोटो, व्हिडीओंना प्रेक्षकांची पसंती मिळताना दिसते. आता एका मुलाखतीत अभिनेत्रीने तिचा फिटनेस मंत्रा काय आहे, ती गोड खाते का आणि किती व कधी खाते, यावर तिने वक्तव्य केले आहे. वल्लरी विराजने काही दिवसांपूर्वी ‘टेली गप्पा’ या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला तिचा फिटनेस मंत्रा विचारला, त्यावर तिने म्हटले, “एक काळ होता, कॉलेजमध्ये जेव्हा मी सतत वजनाच्या काट्यावर उभी राहायचे. तेव्हा मला असं वाटायचं की बापरे इतकं वजन वाढलंय वैगेरे. त्यानंतर लॉकडाऊनपासून माझ्या लक्षात आलं की वजन काट्यावर दिसतंय हे महत्वाचं नाही. तुम्ही किती ॲक्टीव्ह आहात, तुम्ही दिवसभरात काय करताय? तुम्हाला कसं वाटतंय, तुम्हाला छान वाटतंय का? तुम्हाला हवे तसे कपडे घालून तुम्हाला ड्रेसअप होता येतंय का, हे महत्वाचं आहे. त्यामुळे वजनाच्या काटावर उभं राहणं मी अगदीच बंद केलं. मी बरोबर गोष्टी खातेय का, यावर मी लक्ष देते. वजनामागे धावू नका, तुम्ही चांगल्या गोष्टी खा, व्यायाम करा, हालचाल करा, आरोग्यदायी जीवनपद्धतीकडे जास्त लक्ष दिलं पाहिजे.”



# अशा लोकांना हाकलून दिले पाहिजे

काही दिवसांपूर्वी यूट्यूबवरील ‘इंडियाज गॉट लेटेंट’ या शोमुळे मोठा वाद निर्माण झाला होता आणि हा वाद अजूनही सुरूच आहे. प्रसिद्ध यूट्यूबर समय रैनाच्या ‘इंडियाज गॉट लेटेंट’ या शोमध्ये रणवीर अलाहाबादियाने पालकांबद्दल केलेल्या अश्लील वक्तव्यामुळे हा वाद पेटला होता. रणवीरने पालकांबद्दल केलेल्या अश्लील वक्तव्यामुळे त्याच्यावर सामान्य जनतेसह अनेक कलाकार मंडळींनीदेखील टीका केली होती. रणवीर अलाहाबादियाच्याया वक्तव्यानंतर त्याच्यावर सोशल मीडियासह सर्वच माध्यमांमधून टीकेची झोड उठली. अशातच आता सुप्रसिद्ध बॉलीवूड अभिनेते शेखर सुमन यांनीही रणवीरला खडेबोल सुनावले आहेत. शेखर सुमन यांनी, “हे विकृतीचे स्वातंत्र्य आहे. फक्त सॉरी म्हणून चालणार नाही”, असे म्हणत रणवीरला चांगलेच फटकारले आहे. तसेच सरकारलादेखील अशा शोवर बंदी घालण्याची आणि अशा लोकांना देशाबाहेर काढण्याची मागणी केली आहे. एका कार्यक्रमात ‘इन्स्टंट बॉलीवूड’शी बोलताना शेखर सुमन यांनी ‘इंडियाज गॉट लेटेंट’च्या वादावर प्रतिक्रिया दिली आणि रणवीर अलाहाबादियावर जोरदार टीका केली. तसेच पालकांबद्दल केलेल्या अश्लील वक्तव्य ऐकल्यानंतर शेखर सुमन यांनी ‘किळस’ आल्याचेही म्हटले. याबद्दल शेखर सुमन यांनी स्पष्ट केले, “पालकांबद्दल अश्लील टिप्पणी करणाऱ्या अशा लोकांना देशाबाहेर हाकलून लावले पाहिजे. त्यांनी या देशात राहू नये.” शेखर सुमन पुढे म्हणाले, “लोक रोस्टच्या नावाखाली यूट्यूबवर अश्लील गोष्टी करत आहेत आणि त्याला ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य, असं म्हणत आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ असा नाही की, तुम्ही शिव्या द्याल किंवा अशा घाणेरड्या गोष्टी कराल की, ते ऐकून एखाद्या व्यक्तीला मनस्ताप होईल. अशा लोकांना या देशाबाहेर हाकलून दिले पाहिजे.”

# शिवाविषयी गैरसमज

कोणत्याही मालिकेत येणारे ट्विस्ट हे प्रेक्षकांची उत्सुकता वाढवतात. मालिकेत पुढे काय होणार, याविषयी प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता असते.याबरोबरच काही प्रश्नही पडलेले असतात. झी मराठी वाहिनीवर प्रदर्शित होणाऱ्या ‘शिवा’(SHIVA) मालिकेत सतत रंजक वळणे येताना दिसतात. नुकतीच शिवा व आशू पुन्हा एकदा त्यांच्या घरी आल्याचे पाहायला मिळाले. ते येताक्षणी किर्तीने आशू व शिवाबद्दल वाईट बोलले. ते असह्य होऊन सिताईने तिच्या कानाखाली मारल्याचे पाहायला मिळाले होते. आता पुन्हा एकदा किर्ती शिवाविरूद्ध कारस्थान करणार असल्याचे समोर आलेल्या प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे. झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर शिवा मालिकेचा एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की आशूच्या काकांची मुलगी म्हणजेच संपदा व रॉकी एकत्र आहेत. ते एकमेकांवर प्रेम करतात. त्यांना किर्ती एकत्र पाहते. ती त्या दोघांचा फोटो काढते. तेव्हा ती मनातल्या मनात म्हणते, “शिवाबद्दल गैरसमज निर्माण करायला इतक्या लवकर उपाय मिळेल, असं वाटलं नव्हतं मला”, त्यानंतर तो फोटो तिच्या काकांना दाखवते. त्यावेळी ती म्हणते, “मी काहीतरी बोलायला जाणार आणि तुम्हाला ते पटणार नाही.



# श्रेयस काय म्हणाला?

झी चित्र गौरव पुरस्कार' सोहळ्याची सध्या मोठी चर्चा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. २५ व्या वर्षानिमित्त मोठा जल्लोष पाहायला मिळत आहे. अनेक मोठ्या कलाकारांची या सोहळ्याला उपस्थिती असल्याचे पाहायला मिळत आहे. अशोक सराफ, निवेदिता सराफ, सिद्धार्थ जाधव, महेश कोठारे, रितेश देशमुख, सचिन पिळगांवकर, सुप्रिया पिळगांवकर, प्राजक्ता माळी, मृण्मयी देशपांडे, श्रेयस तळपदे, भरत जाधव, पुष्कर श्रोत्री, श्रेया बुगडे अशा अनेक कलाकारांची उपस्थिती पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर अनेक रील्स, व्हिडीओमधून या कार्यक्रमात काय धमाल होणार हे पाहायला मिळत आहे. डान्स, पुरस्कार, कॉमेडी यांची धमाल रंगणार असल्याचे दिसत आहे. यंदाच्या ‘झी चित्र गौरव’ पुरस्कार सोहळ्याच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी रितेश देशमुख व अमेय वाघ यांनी सांभाळल्याचे दिसत आहे. आता या सगळ्यात श्रेयस तळपदेने त्याला पहिला पुरस्कार कधी मिळाला होता, याची आठवण सांगितली आहे.श्रेयस तळपदे त्याच्या पत्नीसह झी चित्र गौरव २०२५ साठी उपस्थित राहिला. त्यावेळी त्याने ‘टेलिगप्पा’ या यूट्यूब चॅनेलशी संवाद साधला.

# ‘झी मराठी’च्या ‘लक्ष्मी निवास’मध्ये एन्ट्री घेणार प्रसिद्ध अभिनेत्री अमृता देशमुख!

‘झी मराठी’ वाहिनीवर गेल्यावर्षीच्या अखेरीस म्हणजेच २३ डिसेंबरला ‘लक्ष्मी निवास’ ही नवीन मालिका सुरू झाली. या मालिकेची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. याचं मुख्य कारण म्हणजे, ‘लक्ष्मी निवास’मध्ये एकापेक्षा एक दमदार कलाकारांची मांदियाळी पाहायला मिळत आहे. हर्षदा खानविलकर, तुषार दळवी, अक्षया देवधर, कुणाल शुक्ला, दिव्या पुगावकर या कलाकारांनी मालिकेत महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. अशातच आता मालिकेत आणखी एका अभिनेत्रीची एन्ट्री होणार आहे. ‘लक्ष्मी निवास’ मालिकेचं कथानक मध्यमवर्गीय जोडप्यावर आधारलेलं आहे. आपलं हक्काचं घर असावं, आपल्या मुलींची थाटामाटात व चांगल्या घरात लग्न व्हावीत अशी लक्ष्मी आणि श्रीनिवास या दाम्पत्याची इच्छा असते. आता या दोघंही आपल्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने प्रवास करत आहेत. आता या दरम्यान मालिकेत मराठी कलाविश्वातील एक लोकप्रिय अभिनेत्री एन्ट्री घेणार आहे.‘लक्ष्मी निवास’मध्ये एन्ट्री घेणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्रीचं नाव आहे अमृता देशमुख. सिंचनाची भूमिका साकारणाऱ्या तन्वी कोलतेने



अमृताच्या एन्ट्रीबाबत पहिली पोस्ट शेअर करत प्रेक्षकांना हिंट दिली होती. तन्वीने सेटवरचा व्हिडीओ शेअर करत अमृता देशमुखचं स्वागत करण्यास अनन्याला ( मालिकेतील छोटी आनंदी ) सांगितलं होतं. या व्हिडीओमधून अमृता या मालिकेत सई ही भूमिका साकारणार असल्याचं स्पष्ट होत आहे. याशिवाय आता स्वत: अमृताने सुद्धा तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर फॅन पोस्ट शेअर करत ‘लक्ष्मी निवास’मध्ये एन्ट्री घेणार असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. नाटक, मालिका, चित्रपट या तिन्ही माध्यमांमध्ये अमृता देशमुखने आपल्या दमदार अभिनयाने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ‘बिग बॉस मराठी’च्या चौथ्या पर्वात अमृताने जबरदस्त खेळीने प्रेक्षकांची मनं जिंकली. अमृता अभिनयाबरोबर उत्कृष्ट आरजे आहे. ‘पुण्याची टॉकरवडी’ म्हणून तिला ओळखलं जातं. काही दिवसांपूर्वी अमृताने प्रेक्षकांना खळखळून हसवण्यासाठी ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’च्या नव्या पर्वात एन्ट्री घेतली होती. आता हास्यजत्रेनंतर अमृता मालिकाविश्वात ‘लक्ष्मी निवास’च्या माध्यमातून पुनरागमन करणार आहे.आता अमृताची ‘लक्ष्मी निवास’ मालिकेत केव्हा एन्ट्री होणार आणि ती साकारत असलेल्या सईचं पात्र नेमकं काय असेल याचा उलगडा प्रोमो आल्यावर होईल. दरम्यान, ‘लक्ष्मी निवास’ ही मालिका रोज रात्री ८ ते ९ असा एक तास प्रसारित केली जाते.

# रहाणे कोलकाताचा नवा कर्णधार!

## वेंकटेश अय्यर कोलकाता नाईट रायडर्सचा उपकर्णधार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोलकाता नाईट रायडर्स संघाने नव्या हंगामासाठी अनुभवी अजिंक्य रहाणेची नियुक्ती केली आहे. वेंकटेश अय्यर उपकर्णधार म्हणून काम पाहील. केकेआर संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेंकी म्हैसूर यांनी सांगितलं की, 'अजिंक्यचा अनुभव संघासाठी अत्यंत मोलाचा असेल. त्याचं नेतृत्व कौशल्य सगळ्यांनाच ठाऊक आहे.**



अजिंक्यच्या नेतृत्वात आम्ही जेतेपद कायम राखू'. नव्या जबाबदारीसंदर्भात बोलताना अजिंक्य म्हणाला, 'कोलकाता नाईट रायडर्स संघाचं नेतृत्व करणं हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. आमच्याकडे अतिशय संतुलित असा संघ आहे. जेतेपद राखण्यासाठी आम्ही तयारी सुरू केली आहे'. कोलकाता नाईट रायडर्स यंदाच्या हंगामाच्या सुरुवात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या लढतीने करणार आहे. २२ मार्चला कोलकाता इथे इडन गार्डन्स मैदानावर हा मुकाबला होणार आहे.

कोलकाता नाईट रायडर्स संघाने २०१२, २०१४ आणि २०२४ मध्ये आयपीएल जेतेपदावर नाव कोरलं होतं. गेल्या हंगामात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात कोलकाता नाईट रायडर्स संघाने जेतेपदाची कमाई केली होती. श्रेयसच कोलकाताचा कर्णधार असेल अशी चिन्हं होती मात्र लिलावापूर्वी श्रेयस कोलकाताचा भाग नसणार हे स्पष्ट झालं. लिलावात पंजाब किंग्ज संघाने श्रेयसला ताफ्यात दाखल केलं. महिनाभरापूर्वी झालेल्या लिलावात सुरुवातीच्या टप्प्यात अजिंक्य रहाणे अनसोल्ड गेला होता. दहापैकी एकाही संघाने त्याला संघात घेण्यात स्वारस्य दाखवलं नाही. लिलावाच्या पुढच्या टप्प्यात कोलकाता संघाने अजिंक्यला त्याच्या बेस प्राईजला अर्थात १.५० कोटी रुपये देऊन संघात समाविष्ट केलं. याच लिलावात कोलकाता संघाने अष्टपैलू वेंकटेश अय्यरसाठी तब्बल २३.७५ कोटींची बोली लावली. अनेक संघ वेंकटेशला ताफ्यात सामील करुन घेण्यासाठी आतूर होते पण कोलकाताने निश्चय ढळू न देता प्रचंड पैसे खर्चून वेंकटेशला पुन्हा संघात सामील केलं. वेंकटेशसाठी कोलकाताचा निर्धार पाहता तो भावी कर्णधार असू शकतो असं संकेत मिळत होते. पण केकेआर संघव्यवस्थापनाने सगळ्यांना धक्का देत रहाणेला कर्णधारपदी नेमण्याचा निर्णय घेतला. अजिंक्यने आयपीएल स्पर्धेत मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स, रायझिंग पुणे सुपरजायंट्स, दिल्ली कॅपिटल्स, चेन्नई सुपर किंग्स आणि कोलकाता नाईट रायडर्स या संघाचं प्रतिनिधित्व केलं आहे. आयपीएल स्पर्धेत १८५ सामन्यांमध्ये अजिंक्यने ४६४२ धावा केल्या आहेत. यामध्ये २ शतकं आणि ३० अर्धशतकांचा समावेश आहे.

### अजिंक्यवर कोटींची बोली

लिलावापूर्वी कोलकाता संघाने सहा खेळाडूंना रिटेन करण्याचा निर्णय घेतला होता. यामध्ये आंद्रे रसेल, रिंकु सिंग, सुनील नरिन, वरुण चक्रवर्ती, हर्षित राणा आणि रमणदीप सिंग यांचा समावेश होता. रिंकूकडे नेतृत्व सोपवलं जाणार अशाही चर्चा होत्या. आंद्रे रसेल आणि सुनील नरिन हे अनुभवी खेळाडू अनेक वर्ष कोलकाता संघाचा भाग आहेत. जगभरात अन्य लीगमध्ये खेळण्याचा अनुभवही त्यांच्याकडे आहे. या दोघांपैकी एकाच्या गळ्यात कर्णधारपदाची माळ पडू शकते अशाही चर्चा होत्या. पण या सगळ्या शक्यतांना पूर्णविराम देत कोलकाताने अजिंक्यकडे नेतृत्वाची धुरा सोपवली आहे. कोलकाता नाईट रायडर्स संघाने २०१२, २०१४ आणि २०२४ मध्ये आयपीएल जेतेपदावर नाव कोरलं होतं. गेल्या हंगामात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात कोलकाता नाईट रायडर्स संघाने जेतेपदाची कमाई केली होती.

# एकट्या भारतासाठी सर्व देशांचा दुबई प्रवास!

## सर व्हिव्हियन रिचर्ड्स यांनी थेट आयसीसीला विचारला जाब!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यंदाच्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं वेळापत्रक आणि सामन्यांचं ठिकाण चर्चेत आणि प्रसंगी वादात आल्याचं पाहायला मिळालं. स्पर्धेचं आयोजन पाकिस्तानकडे असताना भारतानं पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिल्यामुळे भारताचे सर्व सामने दुबईत खेळवण्यात येत आहेत.**




त्यामुळे ज्या देशांचे भारताशी सामने आहेत, त्या देशांच्या संघांना सातत्याने पाकिस्तान ते दुबई आणि पुन्हा दुबईहून परत पाकिस्तान असा प्रवास करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर वेस्ट इंडिजचे महान माजी क्रिकेटपटू सर व्हिव्हियन रिचर्ड्स यांनी थेट ICCला जाब विचारला आहे."मला यासंदर्भाल्या राजकीय गोष्टींमध्ये पडायचं नाहीये. पण या सगळ्या स्पर्धांचं आयोजन ICC कडे आहे. त्यामुळे त्यांनी यावर उत्तर द्यायला हवं", असं सर व्हिव्हियन रिचर्ड्स यांनी म्हटलं आहे.चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताचा समावेश अ गटात करण्यात आला आहे. या गटातील तिन्ही सामने आता झाले असून हे तिन्ही सामने टीम इंडियानं दुबईतच खेळले आहेत. पण त्यासाठी बांग्लादेश, पाकिस्तान आणि न्यूझीलंड या तिन्ही संघांना पाकिस्तानातून दुबईला यावं लागलं आणि नंतर पुन्हा पाकिस्तानला जावं लागलं. भारत विरुद्ध न्यूझीलंड या रविवारी झालेल्या सामन्याआधी तर ब गटात भारताविरुद्ध दक्षिण आफ्रिका खेळणार की ऑस्ट्रेलिया हे निश्चित नसल्यामुळे हे दोन्ही संघ दुबईत डेरेदाखल झाले होते. आता भारतानं न्यूझीलंडला नमवल्यामुळे अ गटा भारत पहिल्या स्थानी असून ऑस्ट्रेलियाशी भारताचा सामना होणार हे निश्चित झालं आहे. त्यामुळे न्यूझीलंड आणि द. आफ्रिका या दोन्ही संघांना त्यांच्या सेमीफायनल सामन्यासाठी पुन्हा पाकिस्तानला जावं लागलं आहे."या सगळ्या वेळापत्रकावर जर कुणी आक्षेप घेत असेल, तर त्यात नक्कीच मुद्दा आहे. मला वाटतं हे सगळं राजकारणामुळे घडतंय. मला त्या राजकारणात पडायचं नाही. पण माझा ठाम विश्वास आहे की या सगळ्याची जबाबदारी असणाऱ्या ICC ची ही खरी समस्या आहे. माझी इच्छा आहे की यावर त्यांनी उत्तर द्यायला हवं. जर क्रिकेटसंदर्भात त्यांनाच अंतिम अधिकार असतील, तर मग सध्या हे सगळं का घडतंय? माझा ठाम विश्वास आहे की जर आपल्या सगळ्यांना कुठली गोष्ट एकत्र आणू शकत असेल, अगदी शत्रूंनाही तर ते म्हणजे खेळ", अशा शब्दांत व्हिव्हियन रिचर्ड्स यांनी त्यांची नाराजी व्यक्त केली आहे.४ मार्च रोजी सेमीफायनलमध्ये टीम इंडिया ऑस्ट्रेलियाशी दोन हात करणार आहे. त्यासाठी ऑस्ट्रेलियाचा संघ दुबईत दाखल झाला आहे. या सामन्यात भारतानं विजय मिळवल्यास अंतिम सामना खेळण्यासाठी न्यूझीलंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील विजयी संघाला पुन्हा दुबईला जावं लागणार आहे.

### 4 मार्चचा सेमीफायनल

इंग्लंडचे माजी क्रिकेटपटू नासर हुसेन व मायकल अॅथरटन यांनीही "भारतीय संघाला इतर ठिकाणी प्रवास करावा न लागण्याचा फायदा होतोय", अशी टिप्पणी केली आहे.एकीकडे टीम इंडिया दुबईत असताना इतर तीन देशांची पाकिस्तान-दुबई अशी प्रवासाची तारांबळ उडत असल्याचं दिसून येत आहे. २ मार्च रोजी न्यूझीलंडच्या संघानं भारताविरुद्ध सामना गमावला. ३ तारखेला न्यूझीलंड प्रवास करून लाहोरला त्यांच्या दक्षिण आफ्रिकेशी सामन्यासाठी पोहोचली. ४ मार्चचा दिवस सराव आणि ५ तारखेला सेमीफायनल.

त्यात विजयी झाल्यास आणि भारत अंतिम फेरीत पोहोचल्यास न्यूझीलंड ६ तारखेला पुन्हा प्रवास करून दुबईत दाखल होणार. ७ व ८ तारखेला सराव आणि ९ ला दुबईत अंतिम सामना. ऑस्ट्रेलियानं २८ फेब्रुवारी रोजी अफगाणिस्तानविरुद्ध सामना खेळला. त्यात पावसानं व्यत्यय आणल्यानंतर दोन्ही संघांना एकेक गुण मिळाला. सेमी फायनलमध्ये पोहोचल्यानंतर भारताशी सेमी फायनल होऊ शकते म्हणून ऑस्ट्रेलियाचा संघ १ तारखेला दुबईत पोहोचला. भारतानं न्यूझीलंडला हरवल्यामुळे ऑस्ट्रेलिया दुबईत ४ मार्चला सेमीफायनल खेळणार. इथे ऑस्ट्रेलियाचा विजय झाल्यास पुन्हा प्रवास करून अंतिम सामन्यासाठी पाकिस्तान गाठणार!

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार ।

। दि. 4 मार्च 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# अभिवाचन स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी उलगडले साहित्यिकांचे अंतरंग

## शिक्षण विश्व: मोरया शिक्षण संस्थेतर्फे राज्यस्तरीय मराठी साहित्य अभिवाचन

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**जग झपाट्याने बदलत असून सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. विद्यार्थी दशेत शिक्षणाला महत्त्व आहे. परंतु अभ्यासाचे दडपण असेल तर त्याचा शरीरावर परिणाम होतो. मानसिक सुदृढतेसाठी शिक्षणाबरोबरच खेळांची आवड जोपासली पाहिजे. तरच तंदुरुस्त, खंबीर समाज निर्माण होईल. पालकांनीही याकडे जागरूकपणे पाहण्याची आवश्यकता आहे. सर्वांगीण विकास साधत देशाची भावी पिढी सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक यांची जबाबदारी आहे, असे मत पीसीईटीचे विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले.**



मोरया शिक्षण संस्थेतर्फे ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी अभिवाचनाच्या अविष्कारातून साहित्यिकांचे विविध अंतरंग प्रेक्षकांसमोर उलगडले.

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून मोरया शिक्षण संस्था चिंचवड यांच्यातर्फे राज्यस्तरीय मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी अभिवाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी श्यामची आई, राजा शिवछत्रपतींचा मावळा व एकनिष्ठ मालुसरे, मुक्या प्राण्यांची माया (कथा), नाट्य, वाचन, काव्यवाचन दख्खनची राणी, पाण्याच्या ढिगावर बसून अशा विविध साहित्याचे अभिवाचन करुन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

या अभिवाचनाच्या स्पर्धेचे बक्षीस वितरण ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, प्राधिकरण निगडी येथे आयोजित करण्यात आले. प्रमुख पाहूणे म्हणून ८ व्या काव्य वाचन संमेलनाचे अध्यक्ष संपत गर्जे, चाटे कोचिंग क्लासेस संचालक गोपीचंद चाटे , मोरया शिक्षण संस्थेच्या संस्थापिका शकुंतला माटे, मोरया शिक्षण संस्थेचे अध्यक्ष स्वप्निल शेडगे, खजिनदार रणजित सावंत, विश्वस्त ऋत्विक पिसोळकर, कार्यकारी सदस्या प्रतिभा कुलकर्णी उपस्थित होते. प्रमुख प्राहुण्यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक यांचे वाटप करण्यात आले.प्रमुख पाहूणे सोमनाथ वाघमारे यांनी श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या ओव्यांमधून मराठी भाषेचे सांगितलेले महत्व उदाहरणासह पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक यश अग्रेसर यांनी केले . आभार श्रीमती प्रतिभा कुलकर्णी यांनी केले.

### विद्यार्थ्यांसाठी स्तुत्य उपक्रम

यावेळी संपत गरजे म्हणाले मराठी भाषा समृद्ध व्हावी, संवर्धन होऊन मराठी भाषेचा संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजावा यासाठी नाट्य वाचन, मराठी साहित्य अभिवाचन, नाट्यसादरीकरण असे विविध उपक्रम मोरया शिक्षण संस्था सातत्याने करते. म्हणूनच मोरया शिक्षण संस्थेचा गौरवशाली, उपक्रमशिल असा नावलौकिक पुणे व पिंपरी चिंचवड मध्ये आहे.



Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

EDUCATING **MIND** AND **HEART**




# सायबर सुरक्षा आणि फसवणूक

| तारीख | वेळ |
| --- | --- |
| 06 मार्च, 2025 | 08:30 AM ते 01:15 PM |

## स्थळ: प्रियदर्शनी स्कूल, आळंदी

सायबर सुरक्षा आणि फसवणुकीवरील विशेष परिसंवादासाठी आमच्यात सामील व्हा, जो तुम्हाला आजच्या डिजिटल युगात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि साधने प्रदान करेल. उद्योग तज्ज्ञांकडून जाणून घ्या नवीनतम सायबर धोके, वास्तविक जीवनातील फसवणुकीच्या युक्त्या आणि तुमचे वैयक्तिक आणि व्यावसायिक डेटा संरक्षित करण्यासाठी आवश्यक रणनीती. या आकर्षक सत्रामध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शन, केस स्टडी आणि डिजिटल सुरक्षेसाठी उपयुक्त उपाय सामाविष्ट असतील. वाढत्या जोडलेल्या जगात माहितीपूर्ण आणि सुरक्षित राहण्याची ही संधी गमावू नका!

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS | www.priyadarshanigroupofschools.org

# महापालिकेच्या लोकशाही दिनाला घरघर!

## लोकशाही दिन उपक्रमात एकूण 6 तक्रारवजा सूचना प्राप्त; समस्या सोडवण्यात दिरंगाई होत असल्याची तक्रार

। पिंपरी-चिंचवड । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या तक्रारी, अडचणी यांची न्याय व तत्परतेने सोडवणूक करणे तसेच नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद वाढवून लोकाभिमुख, गतिमान प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित करत असलेल्या लोकशाही दिनाला घरघर लागली आहे. तीस लाख लोकसंख्येच्या या शहरातून लोकशाही दिनाला केवळ बोटावर मोजणे इतक्या तक्रारी प्राप्त होत असल्यामुळे ,नागरिकांच्या समस्या नक्की या उपक्रमाच्या माध्यमातून सोडवले जातात का असा प्रश्न उपस्थित होत आहे.**



आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सोमवारी (दि 3) रोजी झालेल्या लोकशाही देणामध्ये केवळ सहा तक्रारी प्राप्त झाल्या. गेल्या महिन्यात अर्थात फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या सोमवारी झालेल्या लोकशाही दिनामध्ये दोन तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. लोकशाही दिनाच्या निमित्ताने नागरिक विविध नागरी समस्या, पायाभूत सुविधा, मालमत्ता कर, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आदी विषयांवर तक्रारी आणि सूचना प्रशासनासमोर मांडू शकतात. प्रशासनाच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून या तक्रारींची दखल घेतात आणि त्वरित उपाययोजना केली जाते. त्यामुळे नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकशाही दिन प्रभावी माध्यम आलोकशाही दिनासाठी उपआयुक्त तथा लोकशाही दिन उपक्रम समन्वय अधिकारी राजेश आगळे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, प्रशासन अधिकारी श्रद्धा बोरडे, कार्यकारी अभियंता एस. टी. जावरानी, किरण अंदुरे, सन्मान भोसले यांच्यासह नागरिक उपस्थित होते. आज झालेल्या लोकशाही दिन उपक्रमात एकूण ६ तक्रारवजा सूचना प्राप्त झाल्या. त्यामध्ये अरूंद रस्ते रुंद करण्यात यावेत, काळेवाडी येथील तापकीर मळा चौक, राजवाडे नगर या भागातील रस्त्यांचा विकास करावा, पाण्याच्या टाकीतील पाण्याचा पाणीटंचाई असलेल्या भागात पाणीपुरवठा करावा, काळेवाडी पोलीस चौकीसमोरील महापालिका दवाखान्याचे प्रशस्त जागेत स्थलांतर करावे, सिमेंट किंवा काँक्रीटच्या मोठ्या ड्रेनेज लाईन्स टाकाव्यात या सूचनांचा समावेश होता.

> “ लोकशाही दिनात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी आपली तक्रार विहित नमुन्यातील अर्जाद्वारे महानगरपालिकेकडे पाठवावी. हे अर्ज नागरी सुविधा केंद्रांमध्ये विनामूल्य उपलब्ध असून, त्यांची पूर्तता करून लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी सादर करणे आवश्यक आहे. नागरिकांनी आपल्या परिसराच्या विकासासाठी सक्रिय सहभाग घ्यावा आणि आपल्या समस्या व सूचना मांडून या लोकाभिमुख उपक्रमाचा लाभ घ्यावा. प्रशासन आपल्या प्रत्येक समस्येची गांभीर्याने दखल घेईल आणि त्यावर आवश्यक उपाययोजना केल्या जातील.
>
> –विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त




Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!